MHAH230002142016

**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १०१/२०१६ मधील नि. ४५ वरील आदेश</u>**

**भाऊसाहेब लक्ष्मण खेतमाळीस व इतर वि. अशोक मोतीराम खेतमाळीस व इतर**

१. अर्ज व म्हणणे पाहिले. उभय पक्षांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२. वादी यांनी अर्जात कथन केले आहे की, दाव्याचे कामकाज चालु असतांना दिनांक १६/०६/२०२१ रोजी प्रतिवादी नं.४– दत्तु लक्ष्मण खेतमाळीस हे मयत झालेले आहेत. त्यांचे वारस दाव्यामध्ये समाविष्ट करावयाचे आहेत. परंतु, मयत प्रतिवादी नं.४ यांचे वारस अभिलेखावर मुदतीत घेण्याचे व त्याबाबत आवश्यक ती पुर्तता करण्याचे वादी यांचेकडून राहुन गेले आहे. त्या अनुषंगाने मयत प्रतिवादी नं.४ यास पत्नी नामे श्रीमती हौसाबाई दत्तु खेतमाळीस असे वारस आहेत. त्यामुळे प्रतिवादी नं.४ च्या सर्व वारसांना अभिलेखावर घेवून त्याबाबतची दुरुस्ती मुळ दाव्यात करणे गरजेचे आहे. प्रतिवादी नं.४ यांचे वारस अभिलेखावर न आल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ४ याचे वारस अभिलेखावर आणण्यास व त्याप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी असे वादीचे कथन आहे.

३. प्रतिवादी यांनी त्याच अर्जावर म्हणणे देवुन अर्जास विरोध दर्शविला. त्यांच्या कथनानुसार अर्ज खरा व बरोबर नाही. सबब, त्यांनी अर्ज रद्द करण्याची विनंती केली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन करता, वादी यांनी नि. ४६ येथे प्रतिज्ञापत्र दाखल करुन कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. ४ दिनांक १६/०६/२०२१ रोजी मयत झाले आहेत. तसेच वादीतर्फे नि.४९ लगत सादर केलेल्या मृत्यु प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रतिवादी नं.४ हे दि. १६/०६/२०२१ रोजी माळीनगर, श्रीगोंदा, ता.श्रीगोंदा, जि. अहमदनगर येथे मयत झाले असून सदरचे प्रमाणपत्र दि.०७/०७/२०२१ रोजी देण्यात आले आहे. प्रस्तुतचा अर्ज दि.

२१/०६/२०२३ रोजी म्हणजेच १ वर्ष ११ महिन्यांच्या विलंबाने दाखल केलेला आहे. तसेच प्रतिवादी यांनी दिलेले म्हणणे पाहता, प्रतिवादी नं.४ मयत झाल्याबाबत अभिलेखावर वाद नाही. तसेच मयत प्रतिवादी नं.४ चे प्रस्तावित वारस ४अ हे कायदेशिर वारस असलेबाबतदेखिल दुमत नाही. प्रस्तुत दावा ताबा, नुकसान भरपाई मिळणेसाठी व निरंतर मनाई हुकुमासाठी केला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ४ चे वारस दाव्यात आवश्यक पक्षकार आहेत. सर्व आवश्यक पक्षकारांचे दरम्यान वादप्रश्नाचे निरसन एकाचवेळी होणे आवश्यक असल्याने मयत प्रतिवादी नं.४ चे प्रस्तावित वारस अभिलेखावर येणे व त्याप्रमाणे मुळ दाव्यात त्याबाबतची दुरुस्ती होणे आवश्यक आहे. करीता, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अर्ज नि. ४५ मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.४ याचे वारस दाव्यात समाविष्ट करुन त्याबाबतची आवश्यक दुरुस्ती पुढील तारखेपर्यंत मुळ दाव्यात करावी.

AMIT NAGESH KULKARNI
Digitally signed by AMIT NAGESH KULKARNI
Date: 2023.07.01 18:06:35 +0530

**( अ.ना. कुलकर्णी )**
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर.

श्रीगोंदा.
दिनांक ०१/०७/२०२३.